## कार्यालय पोलीस उप अधिक्षक,लाच लुचपत प्रतिबंधक विभाग,जालना

**टोल फ्रि क्रमांक १०६४**

**कार्यालय दुरध्वनी क्र. :- ०२४८२-२२०२५२**

**:: प्रेस नोट ::** **दिनांक :- ०२/०४/२०१९.**

**तालुका कृषी अधिकारी बदनापुरचे चे अनुरेखक श्री.विजय लक्ष्मणराव कांबळे यांना ५००/- रुपयाची लाच घेतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालनाच्या पथकाने पकडले**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | आरोपीचे नाव, हुद्दा व पत्ता | :- | आरोपी लोकसेवक श्री.विजय लक्ष्मणराव कांबळे वय 57 वर्ष,व्यवसाय.नौकरी, अनुरेखक तालुका कृषी अधीकारी कार्यालय बदनापुर, रा.किर्ती हाऊसिंग सोसायटी, एन-8 सिडको,औरंगाबाद |
| २ | गुन्हा घडला तारीख, वेळ व ठिकाण | :- | दि.०२.०४.२०१९ रोजी तालुका कृषी अधिकारी कार्यालय,बदनापुर जि.जालना येथे. |
| ३ | लाचेची रक्कम | :- | ५००/- रुपये लाचेची मागणी करुन स्विकारली. |
| ४ | सापळा अधिकारी | :- | श्री.आर.डी.निकाळजे, पोलीस उप अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना |

याबाबत थोडक्यात हकीगत अशी आहे की, यातील तक्रारदार यांनी समृध्द शेतकरी अभियाना अंतर्गत १,१०,०००/-रुपयाचे ट्रॅक्टरचे रोटाव्हेटर खरेदी केले होते सदरच्या योजने अंतर्गत ५० टक्के सबसिडी असल्याने त्यांनी सबसीडी मिळणे कामी फाईल पुर्ण तयार करुन दि.३१/०३/२०१९ रोजी बदनापुर येथील कृषी कार्यालय येथे फाईल दाखल करण्यासाठी गेले असता आलोसे श्री.कांबळे यांनी फाईल दाखल करुन घेण्यासाठी ५००/- रुपये दिल्या शिवाय फाईल दाखल करुन घेणार नाही असे सांगीतले.तक्रारदार यांची श्री.कांबळे यांना लाच द्यायची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना येथे तक्रार नोंदवली होती.

दि.०१.०४.२०१९ रोजी सदर तक्रारीचे अनुषंगाने ला.प्र.विभागाने श्री.कांबळे यांच्या लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता श्री.कांबळे यांनी तक्रारदार यांचे कडे सदर रोटाव्हेटरची सबसीडी फाईल दाखल करुन घेणेसाठी ५००/- रुपये दिनांक ०२/०४/२०१९ रोजी स्विकारण्यास तयार झालेचे निष्पन्न झाले. आज दि.०२.०४.२०१९ रोजी तालुका कृषी अधिकारी कार्यालय,बदनापुर जि.जालना येथे. येथे श्री.कांबळे यांचे विरुध्द लाचेचा सापळा लावला असता त्यांना तक्रारदार यांचेकडुन राहीलेली लाचेची रक्कम ५००/- रुपये स्विकारतांना रंगेहाथ पकडण्यात आले. त्यांचे विरुध्द गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

**तसेच ॲन्टी करप्शन ब्युरो कडुन अवाहन करण्यात येते की कोणी लोक सेवक शासकीय कामासाठी लाचेची मागणी करीत असल्यास ०२४८२-२२०२५२, तसेच टोल फ्री क्रमांक १०६४ वर संपर्क करावा. तसेच पोलीस उप अधिक्षक जालना मो.नं.८९७५७६२९०६, पोलीस निरीक्षक मो.नं. ९८२३१४२६३२, ९७६७७४७७७४ वर संपर्क करावा.**

पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,जालना